# <u>प्रेसनोट</u>

दि. ०७/११/२०२३

## सजा - सोनोरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील तलाठी व खाजगी इसम यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) निलेश सुभाष गद्रे, वय ४२ वर्ष, पद – तलाठी (वर्ग-३), सजा - सोनोरी, ता. पुरंदर, जि. पुणे.<br>२) आदित्य मधुकर कुंभारकर, वय २१ वर्ष, रा. वजपुरी, ता. पुरंदर, जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- रुपये (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०७/११/२०२३ |
| सापळा दिनांक | ०७/११/२०२३ |

ठिकाण :- दिवे गाव, ता. पुरंदर, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे शेतकरी असून तक्रारदाराच्या आजोबांनी तक्रारदारांना बक्षीसपत्राने ३९ गुंठे जमीन दिली होती. सदर बक्षीसपत्राची नोंद सात-बारा उता-यावर करण्यासाठी तक्रारदार यांनी रितसर अर्ज सजा सोनोरी कार्यालयास दिलेला होता. सजा कार्यालयातील तलाठी लोकसेवक निलेश गद्रे यानी तक्रारदार यांचेकडे सदर बक्षीसपत्राची नोंद सात-बारा उता-यावर करण्यासाठी ५,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यानी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक क्र. १ निलेश गद्रे व आरोपी क्र. २ खाजगी इसम आदित्य कुंभारकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे आजोबांनी बक्षीसपत्राद्वारे दिलेल्या जमीनीची नोंद सात-बारा उता-यावर करण्यासाठी ५,०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, आरोपी क्र. २ आदित्य कुंभारकर यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ५,०००/- (पाच हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले. म्हणुन त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.